म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २३५८

REFBK-0022380
REFBK-0022380

२३५९
काव्य
२२३८०
१९।१०।७८
संदर्भ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

18 DEC 1988

(कृ.मा.प.)

# बाजीराव
# आणि
# मस्तानी

[ कविता संग्रह ]

कवि
**वसंत नलावडे**

REFBK-0022380
REFBK-0022380

विद्यार्थी प्रकाशन, पुणे ९

प्रकाशक—
रविंद्र दत्तात्रय खोपकर, व भगवंत शंकरराव साळवी,
विद्यार्थी प्रकाशन,
१७८ ब पर्वती,
पुणे ४११००९.

प्रथमावृत्ती—
२० नोव्हेंबर १९७७

© सौ. सत्यवती वसंत नलावडे

मुखपृष्ठ—
शि. द. फडणीस.

मुद्रक—
सौ. कमल रामचंद्र घळसासी,
संजीव मुद्रणालय,
४६९ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

किंमत सहा रुपये

पुणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात रविवार दि. २०।११।७७ रोजी सकाळी ११ वाजता कविवर्य ग.दि. माडगूळकर यांचे अध्यक्षतेखाली मा. स्वागताध्यक्ष सुप्रसिद्ध कवि व ग्रामीण लेखक श्री. ग. ल. ठोकळ यांचे शुभहस्ते या कविता संग्रहाचे प्रकाशन झाले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22360
काव्य
2345



अर्पण—
महाराष्ट्राचे गुलजार
भावगीत गायक—
श्री. गजानन वाटवे यांना—

तुझे ऐकता गीत, गजानना
गगनी थांबला-सायंतारा
झुंजू मुंजू झालं आकाश
स्वरांचा फोफावला वारा—

मस्त रात्री मस्त चांदण्यात
ओली झाली गोरी गोरी उन्मादक पाऊले
आणि मैत्रिणींनी नाव घेत घेत
उंबरठ्यावरले माप सांडले—

दोन ध्रुवामधले अंतर सरले
चंद्रावर हसले दोन गुलाब
अन् तू झालास भावगीतांचा नबाब
दिलेस अनेकांना सूरातुन जबाब—

प्रेमाचा गुलकंद खात खात
घरधनी दर्यापार गेला
व्हलवीत झप झप मचवा
सुटला वादळ वारा, दूर किनारा
बेईमान झाला, पुरा पुरा —

नका मारू खडा, शिरी भरला घडा
सैल झाला अंबाडा
सांगत सुटली वेडी राधा
का ? तुझ्याच स्वरमुरलीची
तिलाही झाली बाधा--

तूच पाहिलीस पेशवे उद्यानी
बाकावर बसलेली कुणी
भेळ खाताना, आधुनिक
बाजीराव-मस्तानी--

तू भावगीतांचा गौरीशंकर जिंकलास
सागराचा तळमळणारा प्राण तू
तुझ्या कंठात आणलास—
बापूजींची प्राणज्योति तू
स्वरांनी सतत तेवत ठेवलीस

तू क्रांतीचा जयजयकार केलास
गीत रामायणात तू सुमंत झालास
असंख्य रसिक मनांच्या यमुनाकाठी
तुझ्या स्वरांचा ताजमहाल अढळ राहिला

सर्वांच्याच प्रेमस्वरुप आईस
तू कोटी कोटी अश्रूंचे
अर्घ्य वाहिलेस--
त्या असंख्य देवमातांचे
गजानना, तुला अनंत आशिर्वाद

वसंत नागवेकर

## प्रिय वाचक,

" भारत आमुचा जगी महान " या माझ्या पहिल्या कविता संग्रहाचं सर्वांनीच अपार कौतुक केलं. तो संग्रह प्रामुख्याने राष्ट्रीय गीतांचा होता. महाराष्ट्र शासनाने ग्रंथालयांसाठीही तो संग्रह पुरस्कृत करुन रसिकांच्या मान्यतेवर शिक्कामोर्तब केलं.

आता माझा दुसरा काव्यसंग्रह " बाजीराव आणि मस्तानी " हा आपल्या सेवेसाठी सादर करीत आहे. या संग्रहाचा साज एकदम आगळा आहे. मानवाच्या विविध भावनांचं व स्वभावाचं दर्शन या संग्रहात तुम्हाला आढळेल आणि इंद्रधनुष्याच्या विविध रंगांप्रमाणे तुम्हाला मोहवील असा मला विश्वास वाटतो. यातील विडंबन व विनोदी काव्ये तुम्हाला मोरपिसांनी गुदगुल्या करतील तर प्रीतीकाव्ये प्रणयरसाचे गुलाब-पाणी शिंपून तुमच्या चित्तवृत्ती मोहरून टाकतील ! माझ्या स्वर्गीय आईला वाहिलेल्या भावपुष्पांजलीनं आपल्या डोळ्यांच्या कडा पाणावल्याशिवाय राहणार नाहीत !

या पुस्तकाचे प्रकाशन पुणे येथे भरलेल्या ५७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात होत आहे. कविसंमेलनाचे अध्यक्ष आधुनिक वाल्मिकी कविवर्य श्री. ग. दि. माडगुळकर यांच्या उपस्थितीत आणि साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष सिद्धहस्त ग्रामीण कथाकार व कवि मा. ग. ल. ठोकळ यांच्या हस्ते माझ्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्याचे परमभाग्य मला लाभले आहे.

या पुस्तकाचे विलोभनीय मुखपृष्ठ ही, महाराष्ट्राचे लाडके व्यंगचित्रकार श्री. शि. द. फडणीस यांच्या कुशल कुंचल्याची करामत ! हा योग जुळवून आणण्यात माझे परम स्नेही ती. दादासाहेब वऱ्हाडे यांचे सर्वार्थाने बहुमोल साह्य झाले आहे. माझे बंधुतुल्य स्नेही श्री. साळवी व श्री. खोपकर या प्रकाशकद्वयाचे आभार मी कोणत्या शब्दाने मानू ! त्यांचे साह्य नसते तर हा संग्रह इतक्या आकर्षक स्वरूपात आपल्या पुढे आलाच नसता ! ज्यांच्या आवाजाच्या स्पर्शाने माझ्या अनेक भावगीतांचे शब्द जणू जिवंत होऊन उठले ते आवाजांचे जादूगार भावगीत गायक श्री. गजानन वाटवे यांचेही माझ्यावर उपकार आहेत. त्यांच्या आवाजातून माझ्या " **बाजीराव आणि मस्तानी** "ने मराठी काव्य रसिकांची मने यापूर्वीच काबीज केली आहेत. माझे एक साहित्यिक स्नेही व " मेघदूत "

या एकेकाळी गाजलेल्या मासिकाचे संपादक श्री. श्रीविलास कुलकर्णी यांचा व तसेच मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. घळसासी व कामगार यांचा ऋणनिर्देश करणेही माझे कर्तव्य ठरते.

साहित्य क्षेत्रातील महर्षी वंदनीय म. म. दत्तो वामन पोतदार यांनी वेळोवेळी कौतुकाने दिलेला आशीर्वाद हा तर माझा अमोल ठेवा आहे ! ! वरील सर्व संबंधितांच्या ऋणात कायम रहाण्याची नव्हे त्यात अधिकाधिक गुरफटण्याची माझी इच्छा आहे.

माझ्या पहिल्या काव्यसंग्रहाप्रमाणेच हा संग्रहही रसिकमान्य होईल असा मला विश्वास वाटतो.

रविवार दि. २०-११-१९७७ आपला स्नेहांकित,

पुणे वसंत नलावडे

# अनुक्रम


| | पृष्ठ क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ बाजीराव आणि मस्तानी | १ | २६ हे आलिंगन मधु | ४४ |
| २ ८० फूट रस्ता | ३ | २७ वाट कुणाची बघे मंजुळा | ४५ |
| ३ तुझी माझी लढाई-थंडी | ५ | २८ तिळ-तीळतुटते उरी | ४६ |
| ४ डबलबार | ६ | २९ रोमन हॉलिडे | ४७ |
| ५ सिनेमात | ७ | ३० तूं मला भेटली तिथे अचानक | ४९ |
| ६ विद्यार्थी मनाचे श्लोक | ८ | ३१ कां वळुनि पाहशी | ५१ |
| ७ गुंड-कायदा आणि तरुण | ११ | ३२ महाराष्ट्राच्या काव्य-कोकिळा | ५२ |
| ८ मंदिर आणि मदिरा | १३ | ३३ चल सखये मदनाच्या गांवा | ५३ |
| ९ उंबरठ्यावर माप ठेविले | १५ | ३४ वेडा अमीर तुझा | ५४ |
| १० नको पुकारुं युद्ध साजणी | १६ | ३५ कुशीतला मम " शशी " लाजला | ५५ |
| ११ एप्रिल–' फूल ' | १८ | ३६ अबोला सोड शाम-सुंदरी | ५६ |
| १२ सोनचाफा | १९ | ३७ तुझी न माझी प्रीत जडे | ५७ |
| १३ मला वाटते | २० | ३८ आता कुणावर करू मी कविता | ५९ |
| १४ ब्रह्मचारी | २३ | ३९ आराम हराम ! हराम ! | ६१ |
| १५ बसस्टॉप | २६ | ४० घ्या मंडळी पान-सुपारी | ६३ |
| १६ जिकडे तिकडे फुलला ' फ्लु ' | २८ | ४१ तीन कडव्यात " तीन कवड्याचे " तीन तेरा | ६४ |
| १७ चला जाऊं या काव्य गायना | ३० | ४२ बेरीज | ६५ |
| १८ कशाला मोहविशी म[illegible] नारी | ३३ | ४३ फेड | ६६ |
| १९ सखे, थांबवाच ही– | ३४ | ४४ अणुगोल | ६७ |
| २० मॉटेसरी | ३६ | ४५ कुठे तू–कुठे मी– | ६८ |
| २१ नवकवींचे कवि-संमेलन | ३८ | ४६ धुंद आहे रात्र सखया | ६९ |
| २२ स्वर्गात ' रामप्रभू ' रडले | ३९ | ४७ भारता लाभो दिव्य प्रकाश | ७० |
| २३ गांठ पडली ठका ठका | ४१ | ४८ पालखी | ७१ |
| २४ काय बोलूं सांग शामा | ४२ | | |
| २५ तमाशाची हौस गड्या फिटली रे | ४३ | | |

नवमासाचे वाहुनी ओझे
जिने घडविले जीवन माझे
ती देवाहुनी पवित्र माता
तिच्या दुधातुन स्फुरली कविता

# बाजीराव आणि मस्तानी

पाहिली पेशवे उद्यानी
बाजीराव आणि मस्तानी ॥ धृ० ॥

हिरव्यागार आंबराईत
कोकिळ गाई मधु-गीत
त्या तिथे गर्द छायेत
बाकावर बसले कोणी (!)
बाजीराव आणि मस्तानी ॥ १ ॥

कुणी सांज-सकाळी रात्री
वेळेची नसे त्या खात्री
प्रीतिचा कुणी महा-मंत्री
घेऊनी चटक चांदणी
बाजीराव आणि मस्तानी ॥ २ ॥

ना अश्व-ढाल-तलवार
हा बाजी सायकलस्वार
ना शेला, ना सुरवार
ये, गरम सूट घालोनि
बाजीराव आणि मस्तानी ॥ ३ ॥

अटकेवर कुठला झेंडा
केसांचा फिरवुनी गोंडा
गुलजार घेउनी "कंडा"
खातसे भेळ-मस्तानी
बाजीराव आणि मस्तानी ॥ ४ ॥

मस्तानी नसे ती मस्त
ठाऊक तुम्हाला दोस्त
भेटती कितीक रस्त्यात

जाऊनी पहा उद्यानी
बाजीराव आणि मस्तानी ॥ ५ ॥

हा बाजी न दुसरा कोणी
तुमच्यातील एकच प्राणी
हिंडतो सदा अनवाणी

शोधीत इथे मस्तानी
बाजीराव आणि मस्तानी ॥ ६ ॥

# ८० फूट रस्ता

[ सिनेपोषाखातील नकली नायक-नायिकांनी गजबजलेला पुण्यातील
" ऐशी फूट " रस्त्याचे सायंदृश्य ]

ऐंशी फूट रस्त्यातुन ऐटीत
चल जाऊ संभाजी बागेत ॥
सांज गुलाबी बघ फुलली
ढगांत नभांत ही हासली ॥ १ ॥

गर्दी गुलाबी ही नामी
' हेमा ', ' रेखा ', ' नीतु ', ' शम्मी ',
हा ' अलबेला ', ' राजेश ' आला
कुणी ' दिले ना दान ' याला ॥ २ ॥

' ढब्बू ' किती हा ' दिलीपकुमार '
पुढे चालला ऋषी गुलजार ॥
गाडी चालवी हा भरदार
किती आखूड पहा याची विजार ॥ ३ ॥

वितभर उंची, टिचभर छाती
केसांचे परि जंगल वरती ॥
पाहून याची कंबर झुलती
असुनी युवक हा, भासे युवती ॥ ४ ॥

अणु-युगातील भरत-कुमार
हातात याच्या चार मिनार
खिशात नाही दमड्या-चार
बेटे निकले सिने-कुमार ॥ ५ ॥

उडे रेशमी दुपट्टा
पहा हिचा तर नट्टा-पट्टा ॥
झिनत-कुमारी, ही नारी
इथे खातसे पाणी-पुरी ॥ ६ ॥

इथेच सगळ्या हात-गाड्या
आणि थांबती बस-गाड्या ॥
रंगी बेरंगी सगळ्या—
इथेच जमती पाकोळ्या ॥ ७ ॥

कुठे शूर तो 'संभाजी'
हे तर सगळे रंभाजी ॥
इथेच फिरती गुलहौशी
रोड असा हा फूट-ऐशी ॥ ८ ॥

## तुझी माझी लढाई-थंडी

तू सखी जिवाची लावण्याची हुंडी
तुझी माझी लढाई-थंडी ॥ धृ० ॥

मानेस देऊनी झटका
नको मारू माशुक मुरका
हा राग पुरे तव लटका
नजरेत तुझ्या मी बंदी
तुझी माझी लढाई-थंडी ॥ १ ॥

मी मियाँ-बिबी तू राजी
तो क्या करेगा काजी
मस्तानी तू, मी बाजी
करू नको सखे इतराजी
मी तुझ्या प्रीतिचा छंदी
तुझी माझी लढाई-थंडी ॥ २ ॥

नवतीची तुझी नवलाई
मी करिता तुझी बढाई
का करिशी भलती चढाई
यंदाची लगीन-सराई
तुज देईन लाडू-बुंदी
तुझी माझी लढाई-थंडी ॥ ३ ॥

## डबलबार !

बायको बोंब मारते
म्हणून आम्ही दोन वर्षे
' कळ ' सोसली आणि
तिच्या इच्छेप्रमाणे
पाळणा लांबविला
पण त्याचा परिणाम
उलटा झाला
घरात आमच्या
चुकून यंदा आम्ही
डबलबार उडविला

## सिनेमात

दोघेच आपण सारे	तिसरे न कोणी होत
जावोनि एकले अन्	बसलोच सिनेमात ॥१॥

झालाच सुरू खेळ	अंधार चहुबाजू
पडताच तुम्ही माझ्या	गळी टाकिलात बाहु ॥२॥

होताच स्पर्श अंगा	सुटलाच मला घाम
डोक्यावरील पंखा	परि देतसे आराम ॥३॥

नव्हते बरे न कोणी	शेजारी आपुल्याही
करिता तरी तुम्ही ' हे '	असले जरी कुणीही ॥४॥

पडद्यावरील चेष्टा	दृष्टीस पडे जेव्हा
भलतेच दृश्य काही,	केलेत तुम्ही तेव्हा ॥५॥

विश्रांति जरी जाहली	तुम्हां परि न शांती
घेवोनि मम खुशाल	बसलात हात हाती ॥६॥

केलीत पराकाष्ठा	सीमा न तुम्हा उरली
म्हणतील तरी काय	मंडळी हीच सगळी ॥७॥

नसता जरी सिनेमा	' नर्गिस-राज 'चा हा
केलात तरी नसता	रोमान्स मजसवे हा ॥८॥

येणार पुन्हा नाही	तुमच्यासवे कधी मी
केलात सिनेमा हा	झालाच बहु नामी ॥९॥

# विद्यार्थ्यांनो हे वाचू नका !

## विद्यार्थी मनाचे श्लोक

मना शांत वर्गामध्ये ना बसावे
खिडकीतुनी बाहेरी तू बघावे
सदा जाई शाळेमधे तू उशीरा
उभा राहुनी अन् करावा पहारा ॥ १ ॥

सदा पेरू–शेंगा, मुंबई–फुटाणे
खावुनी वर्गामध्ये मस्त होणे
स्वतः मात्र खाई मना गोड दाणे
किडके नि सडके तू मित्रास देणे ॥ २ ॥

मना जाऊनी बैस मागील बाकी
हळू आणखी कागदी बाण फेकी
जरी पाहिले रे तुला मास्तराने
त्वरे पुस्तकाआड तू तोंड नेणे ॥ ३ ॥

जयाचा नसे पुस्तकी मागमूस
विचारी असे प्रश्न तू मास्तरास
सदा इंग्रजीचा, तसा संस्कृताचा
बुडवी सदा तास तो व्याकरणाचा ॥ ४ ॥

कधी नाही आले तुला बीजगणीत
तरी चोरुनी पाही मागे वहीत
मिळवी मना मार्क करुनीच "कॉपी"
वरी आणखी माग तू अर्धमाफी ॥ ५ ॥

मना नाही केले कधी 'होमवर्क'
देवोनी थापा करी त्यास गर्क

म्हणावे घरी राहिली आज वही
असे बोलुनी शांत उभाच राही ॥ ६ ॥

सदा वाच कादंबऱ्या मासिके ती
तशी पुस्तके आणखी गुप्त गोष्टी
मना ठेवी कांडी खडुची खिशात
लिहावे फळी जे असे रे मनात ॥ ७ ॥

गड्या ठेव आवळे नि चिंचा हातात
पाहुनी त्यांच्याकडे ( ! ) नित्य खात
मना आण वर्गी सदा गोड पुष्पे
रक्ती गुलाब अन् तसे सोनचाफे ॥ ८ ॥

कुणाचा रुमाल, कुणाच्या खिशात
कुणाचाही टाक कुणाच्या पुढ्यात
कुणाची वहाण, कुणाच्याच पायी
'पार्सल' करावी मना योग्य ठायी ॥ ९ ॥

कुणाच्या तू टोपीवरी लाव झेंडा
लिही त्यावरी विकणे हाच मेंढा
कुणाच्याही सदऱ्यास बांधुन चिंधी
म्हणावे पहा चालला हाच नंदी ॥ १० ॥

जरी केली शिक्षा तुला मास्तराने
तरी नेमकी बुट्टी तासास देणे
कधी पालकांची न चिठ्ठी आणावी
स्वतः खर्डुनी ती, खुशाल तू द्यावी ॥ ११ ॥

कधी शाळेमाजी पडे हरताळ
त्वरे भाग घेई मना तू खुशाल

म्हणावे मुलांनो बाहेर निघाना
अथवा करी बांगड्या जा भराना ॥ १२ ॥

मना वाचुनी हे करावा विचार
पटल्यासी या करी तू प्रचार
मना, सज्जना हे असे का पसंत
विचारी बहु नम्रते मी वसंत ॥ १३ ॥

# गुंड कायदा आणि तरुण

( बॉम्बे सिटी पोलीस ॲक्ट कलम ११७ )

गुंड कायदा जारी केला
पोलीस खात्याने
कसे फिरावे तुम्ही आम्ही
सांगा रस्त्याने ॥ १ ॥

हसणे, वदणे, गंमत करणे
येता जाताना
बंद जाहले यापुढेहि—
तुम्हा आम्हा तरुणा ॥ २ ॥

जर का हसली, तुम्हा पाहूनि
एखादी तरुणी
मुळी न बघणे, तुम्ही तिजकडे
डोळे घ्या मिटुनि ॥ ३ ॥

हसाल किंवा वदाल काही
तिजला पाहून
पोलीस दादा, ठेविल तुम्हा
चौकीत बसवून ॥ ४ ॥

साक्षी पुरावा, मुळी न चाले
अपील यावरती
खास मिळाली असे पोलिसा
" समरी पॉवर " ती ॥ ५ ॥

बंधन नाही, परि पोरींना
याच कायद्याने

खुशाल हसल्या आणि खिदळल्या
जरी त्या रस्त्याने ॥ ६ ॥

अशी कामिनी, चुकून आली
कधी पाहण्यात
कलम कोणते सांगा आहे
यास कायद्यात ॥ ७ ॥

एका हाताने वाजते का ?
कधी हो टाळी
जो तो आपुली शिकार साधुन
मारतोच गोळी ॥ ८ ॥

एकांगी हा असे कायदा
तरुणांवर फास
गव्हा संगती किडे रगडले
जातील ही खास ॥ ९ ॥

## मंदिर आणि मदिरा

पुण्यातील पेशवेकालीन प्रसिद्ध व पवित्र बेलबाग मंदिर ( विष्णू मंदिर ) या ठिकाणी सदर बागेचा माळी दारुभट्टी चालवीत असे पण अखेरीस त्या दारूचा वास भगवान श्री विष्णूला सहन न होऊन त्याला जाग आली व सोमवार दि. १७-७-१९५१ रोजी पोलिसांनी छापा घालून सदरची दारुभट्टी, तयार दारू वगैरे पकडून माळ्यास अटक केली. या सत्यघटनेवरील एक नवल काव्य--

पुण्यात आहे प्रसिद्ध मंदिर
नाव "बेलबाग" ॥
मंदिरातल्या विष्णूला या
आज आली जाग ॥ १ ॥

तीर्थप्रसादा, कुणी कथेला
कुणी कीर्तनाला ॥
भाविक जाती, सांज-सकाळी
रोज दर्शनाला ॥ २ ॥

गुलाब, जाई, तुळशी-मोगरा
फुले जिथे हसती ॥
नवल परंतु तिथे पहा ही
मद्य-फुले फुलती ॥ ३ ॥

अहोरात्र या देवापुढती
दीपज्योत जळते ॥
आणि पलिकडे झोपडीत त्या
दारूही गळते ॥ ४ ॥

मंदिरात या, कापूर चंदन
कुणी नित्य जाळी ॥

तिथेच दारूभट्टी चालवी
बागेचा माळी ॥ ५ ॥

इथे वाजते, रोज पहा हे
मंगलमय वाद्य ॥
तालावरी या कितेक गेले
पिऊनी इथे मद्य ॥ ६ ॥

हरिनामाच्या भजनामध्ये, इथे
गुंगले भक्त किती ॥
मदिरापानासाठी येऊनि, इथे
झिंगले लोक किती ॥ ७ ॥

जिथे सांगती सांज-सकाळी
कथा आणि गीता ॥
तिथे चालवी कोण कसा हा
दारूचा गुत्ता ॥ ८ ॥

ज्या देवाने मंथन करुनी
अमृत प्राशियले ॥
त्या विष्णूचे मंदिर अजि हे
मदिराघर झाले ॥ ९ ॥

## उंबरठ्यावर माप ठेविले

[ लोककवि मनमोहन यांच्या " उंबरठ्यावर माप ठेविले " या भावगीताचा मान ठेवून, वास्तववादी विडंबन-कवि मनमोहन यांची क्षमा मागून ]

उंबरठ्यावर माप ठेविले
मी तोऱ्याने तुडवुनी आले
आले मी सासरी—
बसाया तुझ्याच डोक्यावरी ॥ १ ॥

माहेराची शिकवण घेऊनी
उतावीळ अन् अती होऊनी
झाले मी हावरी—
बसाया तुझ्याच डोक्यावरी ॥ २ ॥

मनासारखे सदा वागले
आईचे ना कधी ऐकिले
हट्टी मी हो पुरी—
बसाया तुझ्याच डोक्यावरी ॥ ३ ॥

तुझ्याच कानी सांज-सकाळी
करीन सासूची कागाळी
भांडण लाविन घरी—
बसाया तुझ्याच डोक्यावरी ॥ ४ ॥

## नको पुकारू युद्ध साजणी—

नको पुकारू युद्ध साजणी
नाही मला आधार ॥
सौंदर्याचे मादक हल्ले, कसे
मी परतविणार ॥ १ ॥

यौवन प्रांतावरी उभा तू
केलिस का ही चाल ॥
नाही डरलो तुला, यशाची
हातात माझ्या ढाल ॥ २ ॥

असे ठावुकी मला साजणी
तुझा गनिमी हल्ला ॥
जीवहि देईन जिंकाया परि
हृदयिचा तव किल्ला ॥ ३ ॥

झालो जखमी लागला उरी
तुझा नयन–बाण ॥
खंत न मला तुझ्या गालीचे
झळके लाल–निशाण ॥ ४ ॥

अखेर थकलो दोघे, आलो
शरण एकमेका ॥
तहनामा मग होय प्रीतिचा
राग सरे लटका ॥ ५ ॥

अटी मान्य मज, मूक भावना
तव हृदयामधल्या ॥
सह्या तहाच्या परस्परांनी
गालावरी केल्या ॥ ६ ॥

विलीन झाली दोन हृदये
ठराव हो गुप्त ॥
आणि आपुले युद्ध–प्रीतिचे
जाहले समाप्त ॥ ७ ॥

# एप्रिल–‘ फूल ’

भूवरती हा वसंत फुलवी, सुमने हर्षांची ॥
गुलाब, जाई–जुई, मोगरा, नाना रंगांची ॥ १ ॥

या सुमनांचा नित्यहि लाभे, तुजला सहवास ॥
स्वागतासही तुझ्याच यांचा, पसरे मधुवास ॥ २ ॥

परि अर्पितो “ फुल ” तुला मी, कधी न पाहिलेले ॥
मानवतेच्या कल्पलतेवर, अजि हे फुललेले ॥ ३ ॥

रंग तयाचा, गंधही तसा, भुलवी मनुजाला ॥
अशा फुलाचा गंध आवडे, काय सखे तुजला ॥ ४ ॥

असे तयाचा गंध विनोदी, फसवणूक सगळी ॥
एक दिनाची शोभा याची, उद्याच ती सरली ॥ ५ ॥

काय असावे गूढ यातले, पाडी जीवा भूल ॥
हुंगताच तुज कळेल सखये, हे “ एप्रिल–फूल ” ॥ ६ ॥

## सोनचाफा

तुझ्या मैत्रिणींचा चालला मिरवत हा ताफा
चालत असताना निखळला वेणीतुन चाफा ॥

हाय ! म्हणालो मी तुटावा गगनातुनि तारा
काय करावे, त्या शेपट्या मुळी नसे थारा ॥

किती चालताना उगाचच नसता हा चाळा
झटका मानेला बैसुनी चाफा हा गळला ॥

तसाच तो चाफा राहिला पडून चौकात
अपुल्या नादात मैत्रिणी गेल्या तोऱ्यात

मला वाटले हा असावा तुझ्याच वेणितला !
परंतु ये शंका, कदाचित् दुसरा जर असला ? ॥

म्हणुनि मारिली मी आघाडी तुझिया सामोरी
मूर्ति तुझी हसरी पाहिली हळुच पाठमोरी ॥

पाठीवर रुळती शेपटे तुझे दोन मोठे
ठाउक परि मजला तयातिल गंगावन खोटे ! ॥

नवल परंतू, का दिसेना तिथे सोनचाफा ?
तुझाच मग तर तो असावा पडलेला चाफा ! ॥

तुझ्या अंतरीची लागली मजला चाहूल
मजसाठिंच तू हे अर्पिले हृदयीचे फूल ! ॥

तसाच माघारी परतलो टाकित मी धापा
हाय ! व्यर्थ सगळे ! उचलला तोहि कुणी चाफा ! ॥

## मला वाटते—

स्वररचना – वसंतराव पवार
गायक – आशा भोसले व वसंत देशपांडे
चित्रपट – दोन घडीचा डाव

मला वाटते, होऊनी कुंतल
तुझ्याच भाळी नाचावे ॥

मला वाटते, भाव होऊनी
तुझ्याच नयनी हासावे ॥

मला वाटते, गुलाब होऊनी
गालाला तव खुलवावे ॥

मला वाटते, होऊनी अमृत
तुझ्याच ओठी साठावे ॥

मला वाटते, गीत होऊनी
तुझ्या गळ्याने ते गावे ॥

मला वाटते, श्वास होऊनी
तुझ्याच हृदयी कोंडावे ॥

मला वाटते, होऊनी छाया
तुझ्या मागुनी हिंडावे ॥

मला वाटते, होऊनी वारा
पदराशी तव झोंबावे ॥

मला वाटते, वस्त्र होऊनी
तुझ्या तनुला बिलगावे ॥

मला वाटते, होऊनी पाऊस
लावण्या तव भिजवावे ॥

मला वाटते, होऊनी आरसा
तुझ्या रुपाला नटवावे ॥

मला वाटते, नेत्र होऊनी
सौंदर्या तव शोधावे ॥

मला वाटते, भ्रमर होऊनी
तुझ्या भोवती गुंगावे ॥

मला वाटते, होऊनी झोला
तुला सारखे झुलवावे ॥

मला वाटते, मेघ होऊनी
चांदणीस या लपवावे ॥

मला वाटते, स्वप्न होऊनी
निद्रेत तुला रिझवावे ॥

मला वाटते, होऊनी कुंपण
फुलोरीस या रक्षावे ॥

यला वाटते, होऊनी कोंदण
हिरकणीस या कोंदावे ॥

मला वाटते, चकोर होऊनी
चन्द्रिकेस या-आळवावे ॥

मला वाटते, होऊनी निर्झर
सरितेत या सामावे ॥

मला वाटते, गगन होऊनी
धरणीला या चुंबावे ॥

मला वाटते, वसंत होऊनी
वनश्रीस या फुलवावे ॥

मला वाटते, गंध होऊनी
कलिकेत या साठावे ॥

मला वाटते, होऊनी पैंजण
तुझ्या पदाला भूषवावे ॥

मला वाटते, रंग होऊनी
तुझ्या जीवनी रंगावे ॥

मला वाटते, पुष्प होऊनी
तुझ्या प्रीतिला पुजावे ॥

मला वाटते, प्राण होऊनी
तुझ्या कुडीला जगवावे ॥

# ब्रह्मचारी

[ ' तो आजन्मं ब्रह्मचारी राहाण्याची भीष्म प्रतिज्ञा करतो. परंतु एका मोहक ' ति 'च्या प्रेमपाशात सापडून हा आधुनिक ब्रह्मचारी अखेर संसारी बनतो--मात्र हा कवि अनुभव खास नव्हे हं ! ]

**तो** :—' नको जाऊ तू, वाटे माझ्या
मी असे ब्रह्मचारी ।
आजन्म राहिन असाच मीही
हिंमत माझी हीच खरी ॥ १ ॥

तुम्ही बायका, उगाच नटता
भुलविण्यास का तरी आम्हा
अभंग आमुचे ' ब्रह्मचर्य ' हे
कधी न जाई शरण तुम्हा ॥ २ ॥

कशास दाविता करुनि नखरा
चाळे तुमचे पुरे आता
सिनेमातल्या नटीसारखे—
थेर कशाला हे करता ' ॥ ३ ॥

**ती** :—' नका दाऊ मज, भाव फुका हा
ठाऊक आहे मला गडे
येता-जाता, कशास मग तरी
चोरुनि बघता माझ्याकडे ॥ ४ ॥

घालीत असता वेणी कधी मी
घेऊनि हातामध्ये फणी
हळुच टाकिता तुम्हीच ना, ती
गुलाब-पुष्पे खिडकीतुनि ॥ ५ ॥

जात कधी मी, पाणी भराया
घेऊनि कळशी हातामधे
'यमुना जळीं खेळुं' तूच कन्हैया
शीळ घालिसी दारामधे ॥ ६ ॥

सांज–सकाळीं, घालित असता
दारी माझ्या पाण–सडे
अंधारातुनि कोण मारी मज
हळुच सांगा लपुनि खडे ॥ ७ ॥

येत मैत्रिणी, भेटाया मज
गप्पा-गोष्टी करित आम्ही
मांजरासम कशास मग तरी
घुटमळता हो दारी तुम्ही ॥ ८ ॥

स्वतःच करुनि चाळे असले
दोष आम्हाला का तुमचा
चोराच्या उलट्या बोंबा, या
न्याय असे का हा तुमचा ॥ ९ ॥

करीन मीहि गंमत तुमची
रहाल ऐसे कोठवरी
सांगुनि माझ्या बाबांना, मी
बनवीन तुम्हा संसारी' ॥ १० ॥

**तो** :—'खरेच का मी 'औदुंबर,' तू
बनशील का ग 'किशोरी'
चिमुकला संसार करु मग
बाळ घेऊनि कडेवरी ॥ ११ ॥

ती :—नका पाघळु, दूर व्हा जरा
हात चालला कोणीकडे ?
दारा आडुनि कोण बघतसे
इश्य ! माझे बाबा गडे ॥ १२ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा
२२३८०
२३५९

## बस स्टॉप

[पुण्यातील बस वाहतूक जरी अनियमीत व अपुरी असली तरी नीमधून घडणारे अनेक गोड प्रसंग फारच मनोरंजक व अविस्मरणीय असतात]

बसगाडीसाठी थांबली रांग भली मोठी
त्या रांगेमधुनी अचानक आलिस तू दृष्टी ॥

आली बसगाडी मोडली क्षणात ती रांग
चढलिस तू वेगे आणि मी, तुज मागोमाग ॥

चढताना माझ्या हाताला, लागे तव हात
सारी कोमलता लाभली तुझिया स्पर्शात ॥

बसलीस तू आत मिळाली जागा तुज नामी
दुसऱ्या बाजुला बैसलो तुझ्या समोरी मी ॥

बावरलो हृदयी पाहता तुजला सामोरी
गुलाब हा फुलला वसरल्या गाली तव लहरी ॥

दृष्टादृष्टीचा जाहला संगम हा अपुल्या
हंसले नेत्र तुझे पापण्या मादक त्या लवल्या ॥

सगळ्या गाडीत दरवळे कसला हा गंध
तुझ्या संगतीचा दाटला सगळा आनंद ॥

अल्लड त्या दोन मैत्रीणी तुझ्याच शेजारी
कारण नसताना उगाचच बडबडती भारी ॥

काय बोलशी तू मैत्रिणी आणि तुझ्या दोन
बोलत असताना पाहशी मजकडे हंसून ॥

हसता हसताना संपली सोबत ही आपुली
आला " स्टॉप " तुझा आणि, तू उतरलीस खाली ॥

उतरत असताना जाहला स्पर्श पुन्हा मजला
खेळ भावनांचा काय तू इथे " स्टॉप " केला ॥

## जिकडे तिकडे फुलला " फ्लु "

मुंबईच्या मधुस फ्लु
दिल्लीच्या लालाला फ्लु
कलकत्त्याच्या बाबुस फ्लु
पुण्यातल्या पांडुस फ्लु
गावोगल्ला फिरतो फ्लु
जिकडे तिकडे फुलला फ्लु ॥

राव रंका आला फ्लु
संत्रीमंत्री यांना फ्लु
आमदार बंधुना फ्लु
काका मामा यांना फ्लु
जिकडे तिकडे फुलला फ्लु ॥

चाळीमध्ये चिंगीस फ्लु
बंगल्यातल्या बेबीस फ्लु
गल्लीमध्ये गणूस फ्लु
रस्तोरस्ती फिरतो फ्लु
फूटपाथवर निजला फ्लु
जिकडे तिकडे फुलला फ्लु ॥

शाळेमध्ये मुलात फ्लु
बागेमध्ये फुलात फ्लु
जनांत फ्लु, वनात फ्लु
तळ्यात फ्लु, मळ्यात फ्लु
गायिकेच्या गळ्यात फ्लु
जिकडे तिकडे फुलला फ्लु ॥

सोडा–लेमन आईस्क्रिम फ्लु
भेळ भजी अन् चिवडा फ्लु
घरी दारी शिरला फ्लु
सिनेमातही लपला फ्लु
जिकडे तिकडे फुलला फ्लु ॥

बंद जाहल्या बसगाड्या
मंद लोकलच्याही नाड्या
ऑफिसात या नाहीत लोक
तिथेही धरिला फ्लुने रोख
जिकडे तिकडे फुलला फ्लु ॥

ताप, पडसे, अंग दुखी
मुळि न सोसवे डोकेदुखी
खोक खोकुनी घसा सुजे
रात्रंदिन या झोप नसे
स्वप्नातही हा फ्लूच दिसे ॥

एक सारखा येतो घाम
किती पुसावा नसे आराम
दुषीत झाली सर्व हवा
महाग आणखी त्यात दवा
जिकडे तिकडे फ्लूच नवा ॥

पेशंटची या रांग किती
डॉक्टरची त्या हो भरती
दवाखान्यापुढती क्यू
डॉक्टरलाही झाला फ्लु
जिकडे तिकडे फुलला फ्लु ॥

## चला जाऊ या काव्यगायना

[ स्वररचना व गायक : श्री. गजानन वाटवे, पुणे ३०
श्री. दत्ता वाळवेकर, पुणे २.]

चला जाऊ या काव्यगायना
मिळुनि साऱ्या जणी ॥
असें बोलुनी विमला-प्रमिला
आल्या या नटुनी ॥ १ ॥

पातळांचे रंग तयांच्या
कशास सांगू मी ॥
'निनॉन'ची ती तलम पातळे
होती बहु नामी ॥ २ ॥

कुणी उर्वशी येई उशिरा
करीत नसते चाळे ॥
गर्दीमधले मिश्किल सगळे
वेधित ती डोळे ॥ ३ ॥

करूनी सगळा नट्टा-पट्टा
पावडर वेणी--फणी ॥
लिहून घेण्या नवीन कविता
आणिती पेन्सील कुणी ॥ ४ ॥

येती घेऊनी, कुणी सोबती
कुणी बेबी-बंडु ॥
कसे कळावे काव्य बेबीला
झोपे हा चन्दू ॥ ५ ॥

सुरुं होता काव्य-गायन
वाजताच पेटी ॥

कुणी चिमुरडी आणुन ठेवी
पेटीवर चिठ्ठी ॥ ६ ॥

मुली चिमुकल्या परकरातल्या
बडबडती भारी ॥
आणि जाणत्या कुणी मारती
गप्पा काही तरी ॥ ७ ॥

एक म्हणे तिज, ‘ कोण तुजकडे
चोरुनि हा बघतो ’ ॥
दुजी म्हणे, ‘ नच तुलाच गे तो
पाहुनिया हसतो ’ ॥ ८ ॥

लहान मूल ते, मधेच रडते
बेबी ती चुकते ॥
व्हॉलेंटियर कांहीं न करती
लुडबुडती नुसते ॥ ९ ॥

कुणी ओरडे, पुरे करा हो
कुणि लिहितो चिट्ठी ॥
कुणी वाजवी मधेच टाळी
कुणि मारी शिट्टी ॥ १० ॥

कुणी डोलतो गायका सवे
कुणि झोपे शांत ॥
कुणी महाशय मधेच हसती
काढुनिया दांत ॥ ११ ॥

खाती फुटाणे–दाणे-शेंगा
कुणि चिंचा–आवळे ॥
कुणी चघळती पान, ओढती
कुणि ‘ हत्ती पिवळे ’ ॥ १२ ॥

आळीतले कुणी 'दादा' (?) करिती
मधेच गुद्दा-गुद्दी ॥
कुणी सोडितो तशात गर्दभ
साधुन ही संधी ॥ १३ ॥

आजु-बाजूला, वरती खाली
बघे कुणी काही ॥
कुणी मोजितो खिडक्या-दारे
कुणि दुसरे काही (!) ॥ १४ ॥

कथा-कीर्तना सोडुनि येती
आबाल-वृद्ध सारे ॥
आणि उधळती इथे आपुल्या
अकलेचे तारे ॥ १५ ॥

परी शेवटी राष्ट्रगीताला
होता सुरुवात
का न थांबे कुणी क्षणभरी
हीच मला भ्रांत ॥ १६ ॥

## कशाला मोहविशी मज नारी !

अप्सरेपरी लाख लाख मी, पाहिल्यात सुंदरी
कशाला मोहविशी मज नारी ॥ धृ० ॥

तेज तुझिया लावण्याचे
तुझ्या बेगडी सौंदर्याचे
मला न कौतुक अशा रुपाचे
मी तर आत्म-पुजारी ॥ १ ॥

तुझ्या तनूवर वस्त्र मलमली
सुवर्ण मोती ही लखलखली
मोहाची ही अमिषे असली
लखलाभ तुला सारी ॥ २ ॥

मुखी तुझ्या जरि अमृत-वाणी
परी लोचनी शराब-पाणी
ओठांमधुनी झरे लावणी
काम-विषय कस्तुरी ॥ ३ ॥

नको वाजवू प्रीत-बासरी
नकोस आळवू गीत सतारी
मला न'आवडे नृत्य विकारी
मी तर संत-विचारी ॥ ४ ॥

वाहू नको मज सुमने असली
विषयवासने ही दरवळली
असे मला ती साधी भोळी
वंद्य तुळसमंजिरी ॥ ५ ॥

## सखे, थांब वाच ही—

सखे, थांब वाच ही
शर्मा स्वीट पाटी ॥
चल खाऊ जिलबी
गरम, शेवगाठी ॥ १ ॥

तुज आवडतो का ? सांग
बदामी हलवा ॥
का हवी सखे तुज
गोड बर्फी-मावा ॥ २ ॥

घे, सुतरफेणी ही
चाखुन पाहू थोडी ॥
हा गुलाब जांबु, किती
अवीट याची गोडी ॥ ३ ॥

हा खमंग कसला वास
म्हैसुरी-पाक ॥
पाहुनी तयाला नको
मुरडू तू नाक ॥ ४ ॥

हे बरणीमध्ये पहा
वाकडे काजू ॥
पाहुनी तयांना नको
लाडके लाजू ॥ ५ ॥

का, दूध केशरी
सांग तुला मी पाजू ? ॥
का, हवी घट्ट तुज
बासुंदीची वाटी ? ॥ ६ ॥

तुज आवडते ना, इथली
स्पेशल–रुम ॥
या इथेच जमले, अपुले
पहिले प्रेम ॥ ७ ॥

तू दिलास मजला, घास
इथे बर्फीचा ॥
अन् मीहि चाखिला जांब
तुझ्या प्रीतिचा ॥ ७ ॥

ही साक्ष ठेऊनी
शर्मा-स्वीट पाटी ॥
तू दिलेस मजला
वचन आजन्मासाठी ॥ ९ ॥

## मॉंटेसरी

संसाराची ऐका माझ्या
मित्रांनो ही गाथा ॥
सौभाग्यवती पुढे टेकिला
अखेर मी माथा ॥ १ ॥

लग्नाआधी सुखात होतो
जणु मीच राजा ॥
लग्नानंतर पहा जहालो
किलवरचा–राजा ॥ २ ॥

संसाराच्या सारीपटावर
मला न कुठला हक्क ॥
राणीच्या राज्यात जहालो
गुलाम मी रंक । ३ ॥

पगार नव्हता, मोठा मजला
पुरता शंभर ॥
घरात शाळा-मॉंटेसरी
जणु पहिला नंबर ॥ ४ ॥

तशात नशिबी होती, माझ्या
मुलींचीच वरणी
एक पाठीच्या चार, पाचवी
पाळण्यात तान्ही ॥ ५ ॥

घेऊनि आल्या तशात साऱ्या
आईचेच रूप ॥
कुठे खपावी पलटन, देवा
दिलास का शाप ? ॥ ६ ॥

तुम्हीच सांगा कशी चालवू
मॉंटेसरी-शाळा ॥
दरवर्षी हा नंबर वाढे
हो हायस्कूल ही शाळा ॥ ७ ॥

म्हणुनि शेवटी गाठियले मी
नियोजन-केंद्र ॥
नवल परंतु तरी ही झाले
जुळे हे सुरेंद्र ॥ ८ ॥

## नवकवींचे कवि-संमेलन

( हे काही नवकाव्य नव्हे, परंतु एका कविसंमेलनातील ही एक सत्य घटना )

" हिरोशिमा " सम भकास चेहरा
नाक लांब अन् आवाज भरडा ॥
हातवारे करित, करी कुणी
फुकट आपुला घसा कोरडा ॥ १ ॥

कुणी गणोबा नावच नुसते
प्रतिभेचे त्या काढी दिवाळे ॥
हातभट्टीसम करीत चाळे
रसिकांचे त्या दिपवी डोळे ॥ २ ॥

पत्त्यातील कुणी राजा कवडे
मंगळास त्या मारी वेढे ॥
कुणी राधेचा घट फोडितो
कुणी प्रियेस्तव हृदय फाडितो ॥ ३ ॥

कुणी पाहता स्वप्न-ललना
लंपट होतो तिच्या दर्शना ॥
एकच कवि परि अखेर उठला
महाराष्ट्राची करीत गर्जना ॥ ४ ॥

## स्वर्गात 'राम प्रभू' रडले

चोहिकडे आभाळ फाटले
कसे तया सावरु ॥
गळू लागली भूमीवरती
त्यातुनहि दारु ॥ १ ॥

घराघरातुनि, मंदिरातुनी
मदिरेचा वास ॥
वासाने या आज आमुचा
बंद होय श्वास ॥ २ ॥

रसायनाचे घरोघरी हे
माठ आणि बंब ॥
नळीतुनी हे पहा झिरपती
दारुचे थेंब ॥ ३ ॥

जिथे हवेली तिथे बाटली
तुळशित लपलेली ॥
जिथे झोपडी, तिथे गाडगी
शिंक्यावर भरली ॥ ४ ॥

बंद जाहले चहा-पान ते
सोडा-लेमन ॥
पिऊ लागले टिंक्चर, जिंजर
लोक थोर-सान ॥ ५ ॥

किति जाहल्या दंड नि शिक्षा
थकले सरकार ॥
दारुने या पहा मांडिला
किती हाहाःकार ॥ ६ ॥

झोप न येई मुळि पोलीसा
स्वप्नी ये बाटली ॥
भास होतसे उशाखालि का ?
भट्टी ही पेटली ॥ ७ ॥

' रामराज्यी ' घरोघरी हे
' तीर्थक्षेत्र ' असले ॥
पाहुनि स्वर्गामध्ये आज हे
' राम प्रभू ' रडले ॥ ८ ॥

आसवे त्यांच्या डोळ्यांमधुनि
ओघळली खाली ॥
भूवरिच्या परि वासाने ती
मदिरा-मय झाली ॥ ९ ॥

# गाठ पडली ठका ठका

गाठ पडली ठका ठका—
अन् मला मिळाला मित्र सखा, प्रीत सखा, जीव सखा ॥ धृ० ॥
दिसावयाला जरा सावळा
स्वभाव याचा भारिच भोळा
सहज फुलवितो प्रीत-मळा
गीत गाऊनि सदाकदा
गाठ पडली ठका ठका ॥ १ ॥
फुलांत फिरतो, मुलांत रमतो
जनांत खुलतो, मनात ठसतो
जगावेगळा मलाच गमतो
कधी बडबडे, कधी मुका
गाठ पडली ठका ठका ॥ २ ॥
पाहुनि याची ही नवलाई
मीही झाले पागल बाई
मनात फुलल्या जाईजुई
कशा जाहल्या गोड चुका (!)
गाठ पडली ठका ठका ॥ ३ ॥
गोड बोलुनि मला भुलवितो
गाण्यांमधुनी गुपित सांगतो
डोळ्यांनी हा मला खुणवितो
(हळुच मागतो एक ××(!)
हे गूढ कुणाला सांगू नका
मला भेटला जीव-सखा ! ॥ ४ ॥

## काय बोलू सांग शामा ?

काय बोलू सांग शामा, बोल ओठांवर अडे
लोचनांची मूक भाषा, का कळे ना तुज गडे ? ॥ धृ० ॥

मी खुळा हे, खूळ कसले, लागले मज ना कळे
पाहता मार्गी तुला का ? थांबती ही पाऊले
थांबणे वेड्या परी मी, हे तुला का आवडे ?
काय बोलू सांग शामा, बोल ओठांवर अडे ॥ १ ॥

यौवनाची मुग्ध लाली, गौर गाली रंगली
चालणे तव डौलदारी, बोलणे ही बुलबुली
चालशी तू राजमार्गी, पायवाटी मी पडे
काय बोलू सांग शामा, बोल ओठांवर अडे ॥ २ ॥

तू महाली भव्य सदनी घेउनि हाती वीणा
छेडिशी ते गीत कसले ? धुंद करिते जे मना
त्या गीताचे सूर का गे ? धावती माझ्याकडे
काय बोलू सांग शामा, बोल ओठांवर अडे ॥ ३ ॥

लाजली संध्या-उषा ही, फुलवुनि नभी रक्तिमा
जीवनि माझ्या-तुझ्या गे, हा हसे मधु-चंद्रमा
ये, अता बोलू मुक्याने ( ! ), जे तुला गे आवडे
काय बोलू सांग शामा, बोल ओठांवर अडे ॥ ४ ॥

## तमाशाची हौस गड्या फिटली रे

तमाशाची हौस गड्या फिटली रे
काखेमाजी झोळी आज आली रे ॥ धृ० ॥

पैशाच्या तालावरी इथे
थुई थुई दुनिया नाचते
चवली पावली निती डोलते
पाहुन डोळ्यावरी झापड आली रे ॥ १ ॥

ओठा-तोंडा लावुनिया रंग
संस्कृती धर्म हो भंग
तरुण पिढी झाली निसंग
लाज-लज्जा बाजारात विकली रे ॥ २ ॥

पुरे धंदा असला छंदी-फंदी
नको ढोलकी, लावणी, रंगी
दंग होऊ देवाच्या अभंगी
घेऊ हातामध्ये टाळ-चिपळी रे
तमाशाची हौस गड्या फिटली रे ॥ ३ ॥

## हे आलिंगन मधु !

कैफात प्रितीच्या गुंग
जणु ही रात्र ॥
पाहुनी हासते—
आपणाला एकत्र ॥ १ ॥

तव मिठीत मादक, धुंद
सखे मम गात्र ॥
नव यौवन फुलले—
तव अंगी सर्वत्र ॥ २ ॥

ही अशीच राहो, रात्र
चौविस-तास ॥
प्रणयास आपुल्या, बहर
येऊ दे खास ॥ ३ ॥

त्रिभुवनी सुटू दे, सखे
तयाचा वास ॥
कळू देत जगाला हे
तुझे नि माझे श्वास ॥ ४ ॥

या लाख तारका, चंद्र
निळ्या आभाळी ॥
तरुतळी इथे तव तनुस
मी कुरवाळी ॥ ५ ॥

तू चंद्रमुखी मज कुशीत
झणि कवटाळी ॥
हे आलिंगन मधु, सुटो
न सखे कधी काळी ॥ ६ ॥

## वाट कुणाची बघे मंजुला

हाती घेऊनी तिळगुळा
वाट कुणाची बघे मंजुला ॥ धृ० ॥

तिळ तियेच्या गालावरला
प्रीत गोडवा हृदयामधला
अबोलीचा रंगही खुलला
कुणा अर्पिण्या गालिच्या तिळा ॥ १ ॥

मीलनास्तव अधिर होऊनी
मार्गावरती नजर रोखुनी
प्रीत घुटमळे नील-लोचनी
गीत गळ्यातुनि झरे झुळझुळा ॥ २ ॥

तोच वाजले पाऊल कोठे
तिळावरी हे हसले काटे
थरारले नयनीचे पाते –
खुले शरीरी अंकुर कवळा ॥ ३ ॥

हळुच येऊनी चोर-पाउला
कुणी झाकीले नेत्र-कमला
अधरांनी या गालावरला
हा तीळ चाखितो प्रीत खुळा ॥ ४ ॥

## तिळ-तीळ तुटते उरी !

आठवता तव मूर्ती हासरी
मार्ग तुडवुनि हा काटेरी
हाती घेउनि तीळ साखरी
आलो तुझिया दारी ॥ १ ॥

आजूबाजूला नव्हते कोणी
तुझीच आठव सोबत घेऊनि
गीत-प्रीतिचे गगनामधुनी
गाई चंद्र-चकोरी ॥ २ ॥

तरंग उठले जलाशयावर
वायु सुगंधित वाहे झरझर
तुझ्या प्रीतिचा गंध मनोहर
उधळी मुग्ध-फुलोरी ॥ ३ ॥

चांदण्यात या प्रशान्त समयी
शीळ कुणाची मंजुळ येई ?
आणिक येता आठव ह्रदयी
होशी काय बावरी ? ॥ ४ ॥

ये ये, सखये धावत धावत
रात्र सुधेची जाई सरकत
नकोस ठेवू तिळास विरहत
तिळ-तीळ तुटते उरी ॥ ५ ॥

# रोमन हॉलिडे

रात्र रुपेरी प्रीत फुलोरी
त्यात गुंगली रोम नगरी ॥
भव्य रोमच्या राज-मंदिरी
झुरे एकटी राज-सुंदरी ॥ १ ॥

मंद सुगंधित व्हेनिस वारा
नभात मिश्किल चंद्र हासरा ॥
करी प्रीतिचा मूक इषारा
तिच्या मनीचा मदन गोजिरा ॥ २ ॥

तोच तियेच्या कानी आले
सूर गीताचे रसरसलेले ॥
मुग्ध संगित यौवनातले
रोमरोमी तिच्या बहरले ॥ ३ ॥

त्या गीताच्या तालावरती
खुले शरीरी यौवनकलिका ॥
प्रीत मीलना प्रासादातुनि
चोर पावुली निघे नायिका ॥ ४ ॥

पत्रकार कुणी तरूण उमदा
तिला भेटला तिथे अचानक ॥
प्रथम प्रीतिचा जगा वेगळा
तिला लाभला आनंद सात्विक ॥ ५ ॥

फिर फिर फिरली मदन-मंजिरी
रूप दर्शने दिपवित नगरी – ॥
लक्ष पऱ्यांची यक्ष-सुंदरी
प्रीत जगाची चढे पायरी ॥ ६ ॥

क्षणैक त्यजुनी राजवैभवा
तिने वंदिले विश्व-मानवा ॥
खुल्या जगाचे मांगल्याचे
तिने ऐकिले गीत प्रीतिचे ॥ ७ ॥

आणि अखेरी निरोप घेता
बंद जाहली प्रीत-दालने ॥
तिच्या प्रीतिची छायाचित्रे
चिंब जाहली अश्रु-लोचने ॥ ८ ॥

## तू मला भेटली तिथे अचानक

तू मला भेटली तिथे अचानक
दुधात साखर पडली ॥ धृ० ॥

डोळ्याशी भिडता डोळा सखये
मनात माझ्या ठसली ॥
हा ध्यास तुझा मज, मी शोधु कुठे तुज
तव प्रीत जीवा या जडली ॥ १ ॥

मी शोधु कुठे तुज, मला लागले
तुझ्या प्रितिचे पिसे ॥
या इथे – तिथे आरशात –
मला तू दिसे ॥
मी जवळी येता हासुनि लाजुनि
पिपात का या लपली ॥ २ ॥

हा डबा चहाचा, ही साखर
आणि हा चमचा ॥
हा हृदयामधला स्टोव्ह पेटला
पंपाविण प्रितीचा ॥
ही दूध बाटली इथे रिकामी
तुझ्या रूपाने नटली ॥ ३ ॥

ही घागर भरली तुझ्या प्रीतिने
तांब्या मीच रिकामा (!)
आज ना उद्या तरी येईल सखये
खास तुझ्या मी कामा ॥
हा स्नो, ही पावडर, ही फणी
तुझ्याविण का रुसली ? ॥ ४ ॥

हा दिन सुना, ही रात्र सुनी
ही सुनीच दुनिया सारी ॥
ये हसवया, ये फुलवाया, तू
बाग इथे संसारी ॥
हा इथे गुंगला भ्रमर तुझा मी
फुलवन्ती तू फुलली ॥ ५ ॥

हे राज्य तुझे, हे भाग्य तुझे
घे, चहा नि पोहे कांदा ॥
ये 'दोन घडीचा डाव' रंगवू
मी गुलाम तव हा बंदा ॥
ही तुझ्या स्पर्शने, तुझ्या दर्शने
हौस जीवाची फिटली ॥ ६ ॥

## का वळुनि पाहशी ?

का पुन्हा पुन्हा वळुनि पाहशी मागे
हुरहुर जिवा या लागे ॥
दो नेत्र तुझे, करिती प्रीतिचा मारा
का मिळेल ह्रदयी थारा ॥
नयनांत तुझ्या हसे चांदणी रात्र
ओठांतही अमृत पात्र ॥
गालांत तुझ्या खुले गुलाबी लाली
प्रीतिची सुमने फुलली ॥
कानांत तुझ्या असे कस्तुरी फाया
जिव अधिर तो हुंगाया ॥
भेटीत तुझ्या जणु भेटतो स्वर्ग
चालता फुलांचा मार्ग ॥
स्पर्शात तुझ्या भरली जादू न्यारी
लाविते ओढ ही भारी ॥
चल घाल सडे, प्रीतिचे तू भूवनी
हा वसन्त हासे जीवनी ॥
ही काव्य-सुमे, तुला पाहुनि स्मरली
तव प्रीत-सुगंधे भरली ॥
या सुमनांची गुंफुनि सखये माला
चल घालु प्रीतिच्याच गळ्याला ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22380
दा. क. का०५
2348
ग्रंथ शाळा (स्थळ प्रत)

## ‘ महाराष्ट्राच्या काव्य-कोकिळा–’

[ पुण्याच्या “ वक्तृत्व विकास मंडळातर्फे ” प्रतिवर्षी साजऱ्या होणाऱ्या वसंत उत्सवात शुक्रवार दि. १८।४।१९५८ रोजी शिवाजी मंदिरात “ कवयित्री संमेलन ” हा कार्यक्रम फारच बहारीचा झाला. सदर कार्यक्रमात राजकवि यशवन्त ( अध्यक्ष ), लोककवि मनमोहन, सौ. संजिवनी मराठे, सौ. पद्मा गोळे, सौ. सरिता पतकी व कुमारी योगिनी जोगळेकर प्रभृतींने भाग घेतला होता. मी मंडळाचा सेवक असल्यामुळे व थोडासा कवी असल्यामुळे सदर कविमंडळींचे स्वागत व ओळख करून देण्याचे काव्यमय कार्य मला करणे भाग पडले आणि आयत्या वेळी—]

शिव-मंदिरी इथे आजला
बहर घेऊनी वसंतातला
( वंदन करण्या शिवरायाला )
महाराष्ट्राच्या काव्य-कोकिळा
कुंजन करिती मंगल आजला ॥ १ ॥

“ मनमोहन ” चा छंद आगळा
मुक्त छंदे रसिक रमला
राजमंदिरी जो शोभला
“ यशवंताचा ” आधार सकलां ॥

“ मंगेशाची ” शामल कांता
गुंगत गुंगत आली “ सरिता ”
भाव-कल्पना फुलवित सुंदर
पराग उधळित आली “ पद्मा ” ॥ ३ ॥

मंगल यांच्या काव्य-गायनी
योगायोगे मिळे “ योगिनी ”
सुहासिनी ही कोमल कंठी
कुंभ घेऊनी, ये “ संजीवनी ” ॥ ४ ॥

## चल सखये मदनाच्या गावा—

चल सखये मदनाच्या गावा
जिथे प्रितीचा मस्त गारवा ॥
तुझ्या मलमली यौवनातला
तिथे फुल्द्द दे गोड ताटवा
चल सखये मदनाच्या गावा ॥ १ ॥
जिथे फुलांचा गंध थिजावा
तिथे तनाचा तोल सुटावा ॥
तुझा पाहुनी नाजुक नखरा
जिथे मनाचा मोर डुलावा
चल सखये मदनाच्या गावा ॥ २ ॥
चंद्र होईल तिथे आरसा
तुझ्या रूपाचा घेत सुगावा ॥
यक्षपुरीच्या लक्ष अप्सरा
तुलाच पाहुनि करतिल हेवा
चल सखये मदनाच्या गावा ॥ ३ ॥
कायेशी तव करण्या कावा
मदन वाजवी मंजुळ पावा ॥
तुझ्या गुलाबी अधरामधला
तिथे प्रीतिचा मधु चाखावा
चल सखये मदनाच्या गावा ॥ ४ ॥
मदनाची तुज होता बाधा
तुझ्या भरजरी शालुमधला ॥
सखे ज्वानिचा बहर खुलावा
तुझ्या गोबऱ्या वक्षामधला
तिथे घुमू दे गोड पारवा
चल सखये मदनाच्या गावा ॥ ५ ॥

## " वेडा अमीर–तुझी— "

वेडा अमीर तुझा आहे तुझ्या समीप
रमतो तुझ्या जीवाशी होऊनी एकरूप ॥ १ ॥

सखये परि तयाची नाही तुलाच खंत
तूही आता तयाचा पाहू नकोस अंत ॥ २ ॥

वेडा अमीर तुझा, आहे तुझा खचित
हा वेड पांघरोनि सांगे तुला गुपित ॥ ३ ॥

संकोचल्या मनाची उघडून तूच द्वारे
हृदयात लपविलेले सांगून टाक सारे ॥ ४ ॥

जीवास जिंकण्याची भारी तुलाच ओढ
वेड्यास आणखी या लावू नकोस वेड ॥ ५ ॥

प्रेमात खिजविण्याची भलतिच तुला खोड
प्रेमास आपुल्या या नाही जगात जोड ॥ ६ ॥

## कुशीतला मम " शशी " लाजला— ?

मी तुझ्यावर करिता प्रीति
गगनामधला शशी हासला ॥
चोरुनि बघण्या प्रणय आपुला
ढगाआड हा जाऊनि लपला ॥ १ ॥

तया न ठावे प्रीत आपुली
कशी रंगते रात्र गुलाबी ॥
तो प्रणयाला भरते आणी
फेकुनि शीतल झोत शराबी ॥ २ ॥

ही चंद्राची मादक किमया
पागल करिते प्रीत जगाला ॥
हिच्या मलमली मधु स्पर्शाने
सखे मनातिल मदन जागला ॥ ३ ॥

मदनाचि त्या येता चाहुल
तुझ्या गालिचा गुलाब फुलला ॥
ओठ भ्रमर हे झुंजू लागता
कुशीतला मम " शशी " लाजला ॥ ४ ॥

## अबोला सोड शाम-सुंदरी

बोल एकदा तरी—
अबोला सोड शाम-सुंदरी ॥ धृ० ॥

काय केला गुन्हा तरी मी
दे मज शिक्षा तू परिणामी ॥
बनेन सेवक तुझाच नामी
देईन तुजला रोज सलामी
रूसू नको मजवरी—
अबोला सोड शाम-सुंदरी ॥ १ ॥

चोरुनि तुजला मी पाहिले
तुला पाहता नयन हासले ॥
(तुझ्या मनीचे गूढ उमगले)
(आणि तयावर काव्य लिहिले)
यास काय तू गुन्हा मानिले ?
अटकेचे फर्मान काढिले
प्रीत-शृंखला करी—
अबोला सोड शाम-सुंदरी ॥ २ ॥

तुझ्या हृदयिचा हा रहिवासी
तूच बनविला का ? वनवासी
तुझ्याच न्यायी ठरवुन दोषी
ठेविलेस का ? तया उपाशी
प्रीत तुझी न्यारी—
अबोला सोड शाम-सुंदरी ॥ ३ ॥

तुजसाठी जीव "तिळतिळ" तुटला
"पाक" प्रीतिचा तया बिलगला ॥

श्यामल अंगी "काटा" खुलला
गौर गालिचा हसे अबोला
"तिळगुळ" माझा जगावेगळा
घेऊनि हा सत्वरी—
अबोला सोड शाम-सुंदरी ॥ ४ ॥

## तुझी नि माझी प्रीत जडे

तुझी नि माझी संगत जडली
तुझी नि माझी प्रीत जडे ॥
सात जन्मीची मैत्रिण माझ्या
होशिल का तू सांग गडे ?
तुझी नि माझी प्रीत जडे ॥ १ ॥
एकलाच मी असा निशि-दिनी
तुझ्या चिंतनी मग्न मनी ॥
विरक्त हृदयी मूक भावना
तुझ्यावाचुनि शब्द अडे
तुझी नि माझी प्रीत जडे ॥ २ ॥
नील नभीच्या लाख चांदण्या
आज जमल्या सख्यास बघण्या ॥
आज पौर्णिमा, नभी चंद्रमा
तुझ्या रुपाचे बिंब पडे
तुझी नि माझी प्रीत जडे ॥ ३ ॥
रातराणीच्या कळ्या गोजिऱ्या
इथे गुंफिती सुगंध गजरा ॥
ये वेचाया, इथे सांडती
प्राजक्ताचे शुभ्र सडे
तुझी नि माझी प्रीत जडे ॥ ४ ॥
शांतहि जग हे, शांत चराचर
एकच घुमतो कंपित हा स्वर ॥
हृदयविणेला तुझ्या प्रीतिचा
मंगल कोमल स्पर्श घडे
तुझी नि माझी प्रीत जडे ॥ ५ ॥

# अता कुणावर करु मी कविता ?

अता कुणावर करु मी कविता ?
इथे न मजला स्फूर्ति आता ॥
अबोल होता शामल कान्ता
झरा आटला हा झुळझुळता
अता कुणावर करु मी कविता ? ॥ १ ॥

वसंतातला बहर ओसरे
ग्रीष्माची ही छाया पसरे ॥
सरली हिरवळ, सरे फुलोरा
चंद्रही ढळला बघता बघता
अता कुणावर करु मी कविता ? ॥ २ ॥

भाव गुलाबी; हास्य लाजरे
सुकुनि चालले प्रीत-मोगरे ॥
मिटले शामल सरोज लोचन
( मूक जाहले कोकिळ-कुजन )
इथे न सरिता, इथे न वनिता
अता कुणावर करु मी कविता ? ॥ ३ ॥

सुन्न मनातिल, खिन्न भावना
एकांती या करिते रुदन ॥
नैराश्येचे चाले नर्तन
भाव स्फुरेना विणा छेडिता
अता कुणावर करु मी कविता ? ॥ ४ ॥

उजाड भासे, नीरस जीवन
करित त्यावरी, अमृत-सिंचन ॥
ये, ये, सखये हासत-नाचत
( क्षणाक्षणाला, कणाकणातुन )
फुलवाया ये जीवन-कविता
तुझ्यावाचुनी स्फुरे न कविता ? ॥ ५ ॥

## ‘ आराम हराम ! हराम ! ’

पुरे अता विश्राम-धाम
दिन-रात करा तुम्हि काम रे
आराम हराम ! हराम ! ॥ धृ० ॥

ऑफिसातल्या खुर्चीवरती
सेवक काही पेंगत बसती ॥
सिगारेटचा झुरका वरती
( येता जाता चहा ढोसती )
नसे तयांना काम
‘ आराम हराम ! हराम ! ’ ॥ १ ॥

शेतकरी शेतात राबतो
गिरणीमध्ये मजूर मरतो ॥
मोटारीतुन मालक फिरतो
घेत हजारो दाम—
‘ आराम हराम ! हराम ! ’ ॥ २ ॥

सांज-सकाळी वेष बदलती
नवी जोडपी मजा मारती ॥
सासू-आई, घरी राहती
करावया घर-काम—
‘ आराम हराम ! हराम ! ’ ॥ ३ ॥

रोज खाउनी तूप नि रोटी
भार भूमिला देह वाढती ॥
लोळण घेता गादीवरती
पंखा पुसतो घाम—
‘ आराम हराम ! हराम ! ’ ॥ ४ ॥

जीवन अपुले हे कष्टाचे
करावया नंदनवन साचे ।।
सिंचन करुनी श्रम-घामाचे
फुलवू ही सुजलाम्
" आराम हराम ! हराम ! " ।। ५ ।।

## घ्या मंडळी पान-सुपारी—!

[ माझे मित्र व लोकप्रिय भावगीत गायक श्री. दत्ता वाळवेकर हे कुणालाही न सांगता पंढरपुरास जाऊन एका गुरुवारी लग्न करून आले. त्यांच्या सौभाग्यवतीचे नाव त्यांनी "आसावरी" असे ठेवले. नंतर आठ दिवसांनी म्हणजे दुसऱ्या गुरुवारी त्यांनी त्यांच्या सर्व इष्ट मित्रमंडळीस लग्नाचे पानसुपारीस बोलावले. त्यावेळी पुण्यातील सर्व लोकप्रिय भावगीत गायकांचे काव्य-गायन झाले. या मंगल प्रसंगी श्री. गजाननराव वाटवे यांनी गायिलेली सर्व लोकांना अतिशय आवडलेली समयसूचक कविता—]

गुरुवारी त्या मंगल दिवशी
न कळत गेलो पंढरीस मी ॥
कुणा न कळता घेऊन आलो
'आसावरी' मज नवरी नामी ॥ १ ॥

जाताना एकलाच होतो
नव्हती पेटी, नव्हता तबला ॥
येताना परि गुंगत आलो
'आसावरीचे' गीत पुण्याला ॥ २ ॥

जाताना मज ठाऊक नव्हते
काय असावे नाव 'तियेचे' ॥
मी तर भोळा 'दत्त दिगंबर'
गीत गातसे 'आसावरीचे' ॥ ३ ॥

आजवरी मी गात आलो
प्रेम कविता लग्नांवरती ॥
माझ्या लग्नाची ही कविता
आज 'वाटवे' येथे गाती ॥ ४ ॥

घ्या ! मंडळी पानसुपारी
असाच ठेवा लोभ नि माया ॥
आशीर्वाद द्या, मंगल आणखि
पुढील वर्षी बारशास या ॥ ५ ॥

## तीन कडव्यात ' तीन कवड्यांचे ' तीन तेरा—

[ "नवयुग" साहित्यकांच्या नाट्य-काव्य कथास्पर्धेमध्ये, काव्याबद्दल मला दुसरे बक्षीस मिळाले. व माझ्या खऱ्या रसिक मित्रांनी माझे अभिनंदन केले. महानगरपालिकेतील गणेशउत्सवातील कवि-संमेलनात माझा सत्कार करण्यात आला व मला हार घातला. हे पाहून माझ्या काही मत्सरी मित्रांनी व हितशत्रूंनी माझ्या कौतुकाबद्दल आक्षेप घेतला व माझ्यावर मत्सरी फडतुस टीका काव्य करण्याचा काही भाडोत्री मित्रांतर्फे प्रयत्न केला. मला त्याची मुळीच खंत अगर खेद वाटला नाही. तथापि त्या मत्सरी मित्रांच्या समाधानासाठी म्हणून जरा कठोर झाले आणि—]

जमवुनि भवती ' कोल्ही-कुत्री '
' काक-कवडे ' आणि भाडोत्री ॥
कुणी ' गणोबा ' फुका बोंबले
प्रतिभेचे त्या काढी दिवाळे ॥ १ ॥

गुणगुणती हे ' मच्छर ' सगळे
मत्सरात हे अखेर जळले ॥
कीव करावी या ' कवडयांची '
कुणा भीति या दिवाभितांची ॥ २ ॥

समेत ज्याला ' हार ' मिळावी
आग त्याची अशीच व्हावी ॥
समेत ज्याला ' हार ' मिळावा
प्रतिभा त्याची खरी वाहवा ! ॥ ३ ॥

कोण बरे हा ? कवि असावा
खरे रसिकां प्रश्न पुसावा ॥

# " बेरीज "—(!)

आदल्या दिवशी, शनिवारी त्या
सखी मजवरी रुसली होती
दुसऱ्या दिवशी, परि रविवारी
भेटाया मज अधीर का ती? ॥ १ ॥

विरक्त हृदयी एकलिच ती
दारामध्ये उभी सारखी
कुणा न ठाऊक गूढ यातले
मीच तियेचा असे पारखी ॥ २ ॥

चंद्र फुलांची उधळित ओंजळ
चंद्र चकोरी तिला हिणविती
असली कसली जगावेगळी
तुझी कुणावर जडली प्रीति ॥ ३ ॥

भिरभिरणारी नजर लाजरी
शीळ ऐकता होय बावरी
शामल अंगी फुले अचानक
रोमांच्याचि गोड शिरशिरी ॥ ४ ॥

तोच कुणाच्या करात कोमल
न कळत झालीस तूही बंदी
अधरांची त्या होता " बेरीज "
चढली मोहक-मादक धुंदी ॥ ५ ॥

## " फेड "—( ! )

मेघ जमले हे आभाळी
पावसाळी सुटत वारा ॥
धावता आसऱ्यास मीहि
बंद केले तूंच द्वारा ॥ १ ॥

पावसाच्या थंड धारा
चिंब आणि मी होय सारा ॥
लोचनी तव शामले का ?
वाहती परि अश्रू धारा ॥ २ ॥

आसरा जरि ना गृही त्या
हृदयी परि मी तव वसे ॥
ते दिलाचे द्वार तुझिया
बंद मजला कधी नसे ॥ ३ ॥

भिजवुनि मज पावसात
जळशी तू का अंतरात ॥
" फेड " त्याची मीच करितो
भिजवुनी तुज चुंबनात ॥ ४ ॥

## ' अणु-गोल '

किती तुझ्यावर लिहिल्या कविता
रात्र संपली गाता गाता
चंद्रालाही ये कंटाळा—
आणि तारका पेंगू लागल्या ॥ १ ॥

सरली संध्या-उषा हासली
फुलवित लाली क्षितिजावरती
रवि-किरणांनी हात पसरले
कवटाळाया शामल-सृष्टी ॥ २ ॥

मला न उरले भान कशाचे
तुझ्या मीलनी मी बे-भान
माथ्यावर जरि सूर्यहि आला
तुज पुढती तो चंद्रसमान ॥ ३ ॥

आणि एकदा शीतल रात्री
तुझी नि माझी मिटली मैत्री
हासत होता चंद्र नभातून
भासत परि " अणुगोल " समान ॥ ४ ॥

## कुठे तू– कुठे मी—

कुठे रातराणी कुठे तेरडा मी
कुठे युवती तू कुठे थेरडा मी ॥
कुठे कोकिळा तू कुठे कोंबडा मी
कुठे नर्तकी तू कुठे लंगडा मी ॥
कुठे पाकुळी तू कुठे नाकतोडा
कुठे मासळी तू कुठे खेकडा मी ॥
कुठे छत्री तू कुठे मी हातोडा
कुठे हिरकणी तू कुठे चुनखडा मी ॥
कुठे बासुंदी तू कुठे "डालडा" मी
कुठे जिलेबी तू कुठे दहिवडा मी ॥
कुठे तू हवेली कुठे मी खुराडा
कुठे तू फुलोरी कुठे मी उकिरडा ॥
कुठे सारंगी तू कुठे चौघडा मी
कुठे थंडी तू अन् कुठे मी उकाडा ॥

## धुंद आहे रात्र सखया—

धुंद आहे रात्र सखया धुंद आपुली दो मने
ही सुधेची पिऊनी मदिरा गुंग सारी ही वने ॥

बिलगल्या वृक्षास वेली भृंग भेदी कमलिनी
छेडिता मी दिलरुबा, तूं दे सख्या आलिंगने ॥ १ ॥

शांत सारे, स्तब्ध तारे गोठले हे गंधवारे
प्रीतिच्या या गारठ्याने अंग माझे का शहारे ॥

ही मिठीची ऊब मिळता एक होती अंतरे
दोन अधरांच्या गतीने रेख गाली रिंगणे ॥ २ ॥

नाद उठता या गतीचा जागली सारी धरा
अलगल्या त्या वृक्षवेली हासल्या गाली जरा ॥

रंग चढला गुलछडीला गंध उधळी मोगरा
का गुलाबी या घडीला तृप्त झाली दो मने ॥ ३ ॥

## भारता लाभो दिव्य-प्रकाश

क्षितिजावरी नव सुवर्णरेषा
भासे सुवर्णमय आकाश
भारता लाभो दिव्य-प्रकाश ॥ धृ० ॥

दास्य संपले, दैन्य पळाले
अंधाराचे सांकट सरले
ज़नजागृति नव तेज प्रगटले
त्या तेजाने राष्ट्र उजळले
सौख्य शांतिचा जनीं सुवास
भारता लाभो दिव्य प्रकाश ॥ १ ॥

लाचारीचे तोडुनी बंधन
स्वाभिमानी घडवा दर्शन
लोकशाहीचे करण्या रक्षण
एकजुटीचे बांधुनी कंकण
निर्भयतेने गाठू नव ध्येयास
भारता लाभो दिव्य प्रकाश ॥ २ ॥

विसरुनी सारी जुनी कटूता
जातिभेद, ती नको विषमता
सदैव राहो मनीं एकता
नवक्रांतिच्या जयघोषाने
मोदे गर्जे हे आवकाश
भारता लाभो दिव्य प्रकाश ॥ ३ ॥

## पालखी

तुझ्या देहाची पालखी आई, नेली मी खांद्यावरी
झाले देहाचे तुझ्या सोनें शुभ गुरुवारी गंगातिरी ॥ १ ॥

होती चतुर्थी ग आई चंद्र दिसला निस्तेज—
तुझ्या देहावरी त्याचे सारे, साकाळले तेज ॥ २ ॥

तुझ्या पालखी संगे, आई, चालले मी अनवाणी
तुझ्या वैकुंठमार्गी केली किती आंसव शिंपणी ॥ ३ ॥

नाही रुतले ग आई पायी माझ्या कांटेकुटे
तुझ्या वियोगाने परि, पदोपदी जीव हा तुटे ॥ ४ ॥

अखेरचा मीच आई तुला पाजिला ना गंगा घोट
जाते मी आता वसंता बोलले का तुझे ओठ ? ॥ ५ ॥

एका क्षणांतच आई सारे घर झाले दुःखी खिन्न
आता मात्र मागे उरे जग सारे शुन्य-शुन्य ॥ ६ ॥

दादा, आप्पा, भाऊ, माई कमा, विमा, इंदू, तारा
यांच्या मायेचा पसारा ठेविलास मागे सारा ॥ ७ ॥

मांजरापासून सर्वांची आई, केलिस ग तूं चिंता
किती केली माया-प्रेम आणि काढिल्यास बहु खस्ता ॥८॥

कधी रुसलो, बोललो आई, कधी वागलो मी कठोर
आता मात्र त्याने माझा भरून ग येतो ऊर ॥ ९ ॥

नको रागावूस आई नको धरूस ग रुसवा
स्वर्गी देवाच्या ग मंदिरी नांदो ग तुझा गोडवा ॥ १० ॥

सांग आई कुणा देऊ मी देवाचा ग प्रसाद
देवानेच नेला माझा तवमायेचा हा प्रसाद ॥ ११ ॥

किती खानदानी आई तुझा बाणा तो ग मराठा
तुझ्या लेकरांचा वाटे तुला अभिमान मोठा ॥ १२ ॥

आई ' नर्मदे ' तव पोटीं जन्मलो मी सान गोटा
तुझ्या दूध पुण्याईने परि, झालो आई आज मोठा ॥ १३ ॥

आंसवांनी सांग देवा विझेल कां ही चिता ?
उदरांत जिच्या माझी निजली ही देवमाता ॥ १४ ॥

तुझ्या मुखातिल तुळशी आई झाले तुळशीरामायण
बालपणी तूच त्याचे- मला दिलेस पठण ॥ १५ ॥

तुझ्या देह अस्थींनी आई, हो पावन इंद्रायणी
तुझी मंगल देवमूर्ती सदा वसे माझ्या मनीं ॥ १६ ॥

आसवांच्या ओवींचा हा घे ग आई अलंकार
आठव या पोरक्याची कर स्वर्गी निरंतर ॥ १७ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22380
दा. क्र. 911.04
2356
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0022380
REFBK-0022380